एक दिवस शाळेसाठी उपक्रमात शाळेची स्वच्छता

माथेरान (वार्ताहर) : सर्वसामान्य पालकांचा कल नगर परिषदेच्या शाळेकडे अधिक असतो. त्यामुळे काही अंशी का होईना मराठी शाळेत जरी पटसंख्या कमी असली तरीसुद्धा हीच शाळा आपल्या मुलांना जीवनातील चढउतार उत्तम प्रकारे शिकविणारी आहे. याचे कारण म्हणजे पालकांचा शाळेवर असलेला दृढ विश्वास. या शाळेचे आपण ऋणी असल्याने आपले काहीतरी योगदान असायला हवे याच दृष्टीने 'एक दिवस शाळेसाठी' हा एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला होता. एक दिवस शाळेसाठी या महत्त्वपूर्ण उपक्रमामध्ये जवळपास ५५ पालकांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये महिला पालकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून संपूर्ण शाळेचा परिसर दि. ६ रोजी स्वच्छ केला. यावेळी उपस्थित सर्व पालकांना नगर परिषदेचे उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी उपहाराची सोय केली होती. याप्रसंगी व्यवस्थापन समिती अध्यक्षा ज्योती शिंदे, मुख्याध्यापक दिलीप अहिरे, शिक्षक लक्ष्मण ढेबे, सचिन भोईर, अनिस पाटील, संतोष चाटसे, निकिता चव्हाण, साक्षी कदम आदी उपस्थित होते. सर्व शिक्षक व पालक या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल मुख्याधिकारी इंगळे यांनी आभार मानले.

माथेरानच्या रोपवे प्रकल्पाचे काम मार्गी लागणार

◆ **माथेरान (वार्ताहर) :**

माथेरानबरोबरच राज्यातील इतर तीन रोप वेंच्या कामांना लवकरच सुरुवात होत असून, मिळालेल्या माहितीनुसार ही सर्व कामांना त्यानुसार वेग आला आहे व कमी वेळात या रोप वेची कामे केली जाणार असल्याने माथेरानचा हा प्रकल्प आता लवकरच मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. निसर्गाने भरभरून अलौकिक निसर्गसौंदर्याची मुक्तहस्ते संपत्ती दिलेल्या माथेरानला दृष्टिक्षेपात आणण्यासाठी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला महत्त्वाकांक्षी रोप-वे प्रकल्प लवकरच मार्गी लागणार असल्याने पर्यटकांना ही पर्वणीच ठरणार आहे. त्यामुळे स्थानिकांच्या व्यवसायात भर पडण्याबरोबरच सर्वसामान्य मोलमजुरांना देखील आगामी काळ सुगीचा ठरणार आहे. मागील काळात या अत्यावश्यक प्रकल्पाला खोडा घालण्याचे महत्वपूर्ण काम काही संस्थांनी तसेच तालुक्यातीलच प्रमुख राजकीय मंडळींनी आपल्या वोट बँकेसाठी हेतूपूरस्सर केले होते. आजवर इथल्या स्थानिकांना आपल्याच न्याय हक्कासाठी संघर्षाच्या अग्निदिव्यांना पार करावे लागले आहे आणि त्याचा सामना इथली मंडळी नेहमीच हसतमुखाने करीत आली आहे. या सर्वच विरोधांना तिलांजलि देत इथल्या सामाजिक, राजकीय मंडळींनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे आता अल्पावधीतच रोप-वेचे काम मार्गी लागणार असल्याने स्थानिकांसह पर्यटकांमध्ये एकूणच आनंदाचे वातावरण दिसत आहे. या प्रकल्पाची लांबी ३३०० मीटर इतकी असून उंची ८५० मीटर इतकी असणार आहे. या प्रकल्पासाठी जवळपास दोनशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदरचा रोप-वे हा आशिया खंडातील सर्वात मोठा रोप-वे ठरणार असल्याचे बोलले जात आहे. हा मार्ग कर्जत येथील भिवपूरी येथुन माधवजी पॉइंटपर्यंत येणार आहे. गेल्या वीस वर्षांपासून माथेरानकर प्रतीक्षेत होते, तो प्रकल्प आता मार्गी लागणार असल्याने एक उत्तम पर्यायी मार्गाची व्यवस्था होणार आहे. सर्व परवानग्या प्राप्त झाल्याने लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यास दीड वर्षांचा कालावधी लागणार आहे. हा प्रकल्प उभा राहात असून माथेरानचे खरे वैभव पर्यटकांना तसेच जिल्ह्यातील नागरिकांना दृष्टीक्षेपात येणार आहे. प्रवास करताना माथेरानच्या चतुर्सिमेकडील पॉइंट्सची नयनरम्य दृश्ये प्रवाशांना न्याहाळता येतील. तसेच पर्यटकांची पैसा व वेळेची बचत होईल.

आमदार महेंद्र थोरवेंच्या हस्ते विविध विकासकामांचे उद्घाटन

◆ **कर्जत (वार्ताहर) :**

बुधवारी सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत दहीवली, संजय नगर, वडवली, किरवली, देऊळवाडी, उक्रूळ, मालवाडी, वाकस, जिते, गारपोली, माणगाव, उमरोली, वांजळे अशा अनेक ग्रामपंचायती व गावांमध्ये विकासकामांचा लोकार्पण सोहळा आणि भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते पार पडले आहे. यावेळी कर्जत तालुक्यातील महत्त्वाच्या समस्या खऱ्या अर्थाने आ. महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून सुटले गेले आणि योग्य व्यक्तीला आम्ही मतदान केल्याचे सार्थ लाभले आहे. यापुढे त्यांनाच मदत करू, असे आश्वासन या उद्घाटननिमित्त मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी दिले. आ. महेंद्र थोरवे यांनी पहिल्याच आमदारकीच्या कारकीर्दीत विकासकामांसाठी तब्बल साडेआठशे ते नऊशे कोटींचा निधी आणला आणि त्याप्रमाणे प्रत्येक गावात विकासकामे चांगल्या दर्जाचे दिसून येत आहे. एवढा विकास आजपर्यंत कधी झाला नव्हता. तो विद्यमान आमदार थोरवेंमुळे झाला असल्याचे पाहावयास मिळत असल्याचे वक्तव्य जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी भाषणात केले आहे. यावेळी आ. महेंद्र थोरवे यांनी भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी जनतेनी माझ्यावर विश्वास ठेवून मला भरघोस मतांनी निवडून दिले, त्यामुळे आज प्रत्येक गावात मी विकासकामांसाठी भरघोस निधी देऊ शकतो. अजून खूप काही कामे करायचे असे आ. थोरवे यांनी सांगितले.

वेचक

बॉक्स अंडरआर्म क्रिकेट स्पर्धांचे आज आयोजन

कर्जत (वार्ताहर) : कर्जत गुंडगे येथील गजानन पार्क बिल्डिंग समोरच्या मैदानात शिवसेना-युवासेना व सोमजाई क्रिकेट क्लब आयोजित नगरसेवक चषक २०२४ नाईट बॉक्स अंडरआर्म क्रिकेट स्पर्धांचे आयोजन शनिवारी करण्यात आले आहे. शनिवार ते रविवार असे दोन दिवस असे बॉक्स अंडरआर्म क्रिकेट स्पर्धा ठेवण्यात आले आहे. माजी नगरसेवक संकेत भासे यांच्या हस्ते प्रत्येक सामन्यात सामनावीर दिला जाईल. मालिकावीर आकर्षक चषक, उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाज आकर्षक चषक यामध्ये प्रत्येक दिवशी ३२ संघ खेळवले जातील.

म्हात्रे कुटुंबीयांच्या वतीने गरजूंना ब्लँकेटचे वाटप

माथेरान (वार्ताहर) : मुंबईमधील बाळकृष्ण म्हात्रे यांच्या परिवाराकडून ब्लँकेटचे व घरगुती वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या वाड्यातील आदिवासी बांधवांना ब्लँकेट, टॉवेल आणि आणि मिठाई बॉक्स वाटप करण्यात आले. या वस्तूंमध्ये ब्लँकेट, टॉवेल आणि मिठाई बॉक्सचा समावेश होता. दि.७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता बॉम्बे हाऊस बंगल्यावर याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावातील गरजवंताना सुद्धा याचा लाभ मिळाला.

अशोक सकपाळ यांना यशस्वी उद्योजक पुरस्काराने सन्मानित

तळा (वार्ताहर) : तळा शहरातील प्रसिद्ध व्यवसायिक अशोक बाळाराम सकपाळ यांना पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आदर्श यशस्वी उद्योजक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.अशोक सकपाळ यांनी वडापावच्या टपरीपासून आपल्या व्यवसायाला सुरुवात केली होती. हळूहळू त्यात प्रगती होऊन त्यांनी आपल्या व्यवसायात वाढ केली. तळा शहरातील सर्वात मोठ्या वाटिका हॉटेलचे ते मालक असून त्यांनी आपल्या सम्राट वडापाव सेंटर व वाटिका हॉटेलमध्ये जवळजवळ वीस नागरिकांना रोजगार दिला. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पनवेल तालुक्यातील पिल्लई कॉलेज सभागृहात रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते त्यांना आदर्श यशस्वी उद्योजक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

जरांगे-पाटलांची एसआयटी चौकशी रद्द करण्याची मागणी

अलिबाग (प्रतिनिधी) : मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एसआयटीच्या मुद्द्यावर रायगड जिल्हयातील मराठा समाज आक्रमक झाला आहे. ही एसआयटी चौकशी रद्द करावी, सगेसोयरे संदर्भातील अध्यादेश तातडीने काढावा आणि मराठा आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, अशा मागणीचे निवेदन सकल मराठा समाजातर्फे बुधवारी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. रायगडमधील सकल मराठा समाजाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते बुधवारी ६ मार्चला अलिबागमध्ये एकत्र आले होते. त्यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयापासून घोषणाबाजी करीत ते जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले. तेथे समन्वयक विनोद साबळे यांच्या नेतृत्वाखाली सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेत आपल्या मागण्यांबाबत चर्चा करून त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

दुय्यम निबंधक कार्यालय किमान ३ दिवस सुरू ठेवा

राकेश वडके यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

◆ **तळा (वार्ताहर) :**

तळा तहसील कार्यालय येथे असलेले दुय्यम निबंधक कार्यालय आठवड्यातून किमान तीन दिवस सुरू ठेवण्याची मागणी शिवसेना शिंदेगटाचे तळा शहर प्रमुख राकेश वडके यांनी रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शासनाला महसूल मिळणारे दुय्यम निबंधक कार्यालय हे महसुलीचे महत्त्वाचे कार्यालय असून गेले सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ हे कार्यालय आठवड्यातून एक दिवसच सुरू असते. सदर कार्यालय हे पद रिक्त असल्याकारणाने दुय्यम निबंधकाकडे पाच तालुक्यांचा अतिरिक्त भार असून इतर पदे देखील रिक्त आहेत, अशी माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे हे कार्यालय आठवड्यातून एक दिवसच उघडले जाते. या दिवशी कनेक्टीव्हिटी नसेल किंवा वीजशट डाऊन किंवा इतर कामानिमित्ताने बंद असल्यास कामाचा खोळंबा होतो तसेच एका कामासाठी वारंवार खेटे मारावे लागतात व कामाचा निपटारा होत नाही.

अशा तक्रारी शिवसेना संपर्क शाखेत प्राप्त झाल्याने व नगरपंचायत गटनेत्या तथा महिला बालकल्याण सभापती नेहा पांढरकामे यांच्याकडे आल्याने शहरप्रमुख राकेश वडके यांनी पक्षाच्या वतीने पुढाकार घेऊन पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांना याबाबत निवेदन सादर केले व आठवड्यातून किमान तीन दिवस दुय्यम निबंधक कार्यालय सुरू रहावा, अशी मागणी सदर निवेदनाद्वारे केली आहे.

याप्रसंगी जिल्हा नियोजन समिती सदस्य लीलाधर खातू, तालुका प्रमुख प्रदूम ठसाळ, नमित पांढरकामे आदी मान्यवर उपस्थित होते.

कर्जत उपजिल्हा रुग्णालयात तिसऱ्या दिवशीही रुग्णसेवा बंद

◆ **कर्जत (वार्ताहर):**

उपजिल्हा रुग्णालयात सध्या अत्यावश्यक सेवा सुरू असून तीन दिवस ओपिडी बंद ठेवण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य गरीब रुग्णांचे हाल सुरू आहेत. कर्जत उपजिल्हा रुग्णालयात ५ मार्च रोजी उपजिल्हा रुग्णालयातील अधिसेविका सविता पाटील यांना पोलीस गुन्ह्यातील आरोपीच्या महिला नातेवाईक यांनी मारहाण केली होती. त्यानंतर कर्जत उपजिल्हा रुग्णालय यांच्याकडून कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. दरम्यान संबंधित महिलेला अटक करण्यात यावी, या मागणीसाठी रुग्णालयाची बाह्य रुग्णसेवा ५ मार्चपासून बंद आहे. त्यामुळे गरीब गरजू रुग्णांचे हाल होत असून पोलिसांनी याप्रकरणी त्या महिलेला अटक करावी, अशी मागणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देशमाने यांनी केली आहे

कर्जत पोलीस ठाण्यातील गुन्हेगार यांना मेडिकलसाठी या रुग्णालयात आणण्यात आले होते. पोलीस गुन्ह्यातील मेडिकलसाठी आणण्यात आलेल्या आरोपीची आई असलेल्या सुरेखा मोरे यांनी रुग्णालयाच्या अधीसेविका सविता पाटील यांच्या कानशिलात मारली, सर्व डॉक्टर, स्टाफ यांना गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली. सविता पाटील यांना झालेल्या मारहाणीबाबत आरोपींवर तसेच आरोपींच्या आईवर दमदाटी करणे, मारहाण करणे तसेच शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याकरिता त्यांच्यावर कलम ३५३, कलम १८६ आणि ११२ या कलमान्वये तात्काळ गुन्हा दाखल झाला. मात्र आरोपीला अद्याप अटक झाली नाही. त्यामुळे त्या फरार असल्याची माहिती समोर येते. सदर प्रकरणाचा पुढील तपास कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय जगताप करीत आहेत. आरोपी महिलेला अटक करण्यात येत नसल्याने मेडिकल असोसिएशनकडून त्यावेळी बंद करण्यात आलेली बाह्य रुग्णसेवा आजही तिसऱ्या दिवशी बंद ठेवली आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

Sr. No.	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	**RFxNo :- 7000030402** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-72/ 2023-2024.** RFx e-tender for work of Painting of Power Transformer/ ICT at various substations under EHV (O&M) Dn. Panvel. **Tender amount Rs. 18,63,907/- , EMD amount Rs. 18,639/-**
2	Online Downloading the RFx	**07.03.2024, 18:00 Hrs. to 14.03.2024, 23:59 Hrs.**
3	Online Submission of the RFx	**On or Before 14.03.2024 up to 23:59 Hrs.**
4	Online Opening of the **Techno Commercial RFx**	**15.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)**

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
Note : All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटसअँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदाच्या कलम १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसा आहे तसाच आहे" आणि "जसा आहे तसाच आहे" या दिवशी केला जाईल.

अ. क्र.	कर्जखाते क्रमांक / शाखा	कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / तारणदार यांचे नाव	१३(२) सूचनेची तारीख येथे असलेली रक्कम (रुपयांत) संबंधीत तारखेला	ताबा घेतल्याची तारीख	मालमत्तेची पाहणी करण्याची तारीख आणि वेळ	राखीव किंमत रुपयांत / ईएमडी रुपयांत	बोली आणि ईएमडी सादर करण्याची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
१	४४१२२१८८ ६००००००९ आणि ४४१२२१०१ ८००००११ / ४४१२ – ठाणे	**१) आशा बळीराम काराळे. २) रोहित नरेंद्र पोतदार**, दोघेही राहणारः सदनिका क्र. ३०६, ३ रा मजला, श्री गुरु माउली अपार्टमेंट, रेनबो स्कूल शेजारी, हेटकर आळी, नेरळ, रायगड ४१०१०१ **येथे देखीलः** दुकान क्र. ६, गणेश प्लाझा, लोवर ग्राउंड फ्लोर, सर्वे क्र. ३३०/२/ए, सीटीएस क्र. १७५, गाव नेरळ तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१ १) **येथे देखील** : आशा लेडीज पार्लर अँड ॲकॅडमी, घर क्र. ९७, बेकरे, पोस्ट माझगाव, वारेडी, नेरळ, रायगड ४१०१०१ २) **येथे देखील** : ए/ ६ शीतल सीएचएस पाटील पाडा फिश मार्केट जवळ, बदलापूर ठाणे ४२१५०३	०४.०७.२०२२ / २६.०५.२०२२ अनुसार रु. २०,९८,५३९.३८/-	३०.१०.२०२३	१३ मार्च २०२४ आणि २२ मार्च २०२४ रोजी स. ११ वा. पासून सायं. ०४. वा. पर्यंत रु.	रु. १५,५९,०००/- / रु. १,५५,९००/-	२६.०३.२०२४ रोजी स. ११ वा ते सायं. ०५ वा. पर्यंत	२७.०३.२०२४ आणि स.११.०० वा. ते दु. २.०० वा.

स्थावर मालमत्तेचे वर्णनः दुकान क्र. ६, गणेश प्लाझा, लोवर ग्राउंड फ्लोर, मोजमापित क्षेत्र ३०६ चौ फूट. बिल्टअप येथे क्र. ३३०/२/ए, सीटीएस क्र. १७५, गाव नेरळ तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१ चा सर्व खंड आणि भूखंड.

इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआरमध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे अदा केले जावे), बोली सादर करण्याचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट, हॉटेल झायका पुढे, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१ संपर्क व्यक्तीः नितीन गमरे–८०७०१०७८९०

आनंद शॉ – ९८२०५२६०४६, शिवाजी खाडे–७०५८०८०९१५.

अटी आणि शर्ती : इ लिलाव 'जसे आहे जिथे आहे' आणि 'जे आहे, ते आहे' तत्वावर घेण्यात येणार आहे.

१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.

२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.

३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.

४. इ लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त इ लिलाव सेवा पुरवठादार मेसर्स सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून संपर्क व्यक्ती : विनोद चौहान (मो क्र ९८१३८८७९३१) यांच्याकडून घेण्यात येणार आहे. इच्छूक बोलीदार याना सल्ला देण्यात येतो की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions येथे भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com येथे भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना इ लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९१९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.

५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.

६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.

७. ही सूचना महत्वाच्या मुद्यांना अनुसरून आहे.

८. बोलीदार यांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. अशा घटना टाळण्यासाठी बोलीदार यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे जे लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेऊ शकतील.

ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

स्थळ : मुंबई , दिनांक : ३१.०१.२०२४
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे महिलांचा सन्मान

◆ **अलिबाग (प्रतिनिधी) :**



महिलादिनाच्या पार्श्वभूमीवर अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे विविध क्षेत्रांत चमकदार कामगिरी करणाऱ्या चार महिलांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुरुवारी (दि. ७) सन्मान करण्यात आला. या चार सत्कारमूर्तींमध्ये सुप्रसिद्ध चित्रकार चंद्रकला कदम, रसायनी पोलीस ठाण्याच्या पोलीस हवालदार सुवर्णा खाड्ये, एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण सोनाली तेटगुरे आणि तिरंदाजी खेळाडू कु. तनिषा वर्तक यांचा समावेश आहे. अलिबाग शहरातील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या अनंत ह. पाटील (नाना) सभागृहात या कार्यक्रमाचे पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते. यावेळी अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकारी निर्मला कुचिक, रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील, आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे आदी मान्यवर उपस्थित होते. अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांनी महिलांची शक्ती मोठी असून, त्यांच्याकडून इतरांनी आदर्श घ्यायला पाहिजे, असे सांगितले. महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकारी निर्मला कुचिक यांनी महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून, पालकांनी आपल्या मुलीला चांगले करिअर करण्यासाठी नेहमीच पाठबळ द्यावे, असे सांगितले. त्याचबरोबर विवाहित महिलांनीही चांगल्या कामासाठी सासरच्यांनी पाठिंबा द्यायला पाहिजे, तरच मुलींसह विवाहीत महिला विविध क्षेत्रांत करिअर करतील, असे सांगितले. रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे यांनी प्रत्येकाने आनंद मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि दुसऱ्यांनाही आनंद द्यायला पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जिल्ह्यातील महिलांना आपला करिअर घडवायचा असल्यास त्यांना त्यांच्या कुटुंबाने पाठिंबा द्यायला पाहिजे, असे सांगितले. अलिबाग प्रेस असोसिएशनने आतापर्यंत समाजातील चांगले हिरे शोधून त्यांचा सन्मान केल्याबद्दल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी जिल्हा क्रीडा संकुलाचा विकास झाल्यास या संकुलातून चांगले खेळाडू तयार होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. मात्र नेहुलीच्या जिल्हा क्रीडा सकुंलाची भयाण अवस्था झाल्याकडे उपस्थितांचे लक्ष वेधताना विविध कंपन्यांनी आपला सामाजिक फंडातून निधी दिल्यास या क्रीडा संकुलाचा कायापालट होऊ शकेल, असे सांगितले. सत्कारमूर्तींपैकी सुप्रसिद्ध चित्रकार चंद्रकला कदम, रसायनी पोलीस ठाण्याच्या पोलीस हवालदार सुवर्णा खाड्ये, एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण सोनाली तेटगुरे यांनीही आपल्या जीवन प्रवासाची माहिती यावेळी दिली. असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर यांनी आपल्या प्रास्ताविकात आढावा घेताना विविध क्षेत्रांतील महिलांचा सन्मान करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. असो.चे सदस्य महेश पोरे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर सचिव राजेश भोस्तेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

निविदा सूचना-८५ (२०२३-२४)

म्हाडा MHADA

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी. फ दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई - ४०००१२. यांचेकडे म्हाडा/ सिडको/पी.डब्ल्यू.डी/सी.पी.डब्ल्यू.डी/एम.आय.डी.सी./बी.पी.टी./एम.ई.एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी-१ फॉर्ममध्ये [टक्केवारी दर] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम रु.	१% इसारा रक्कम	सुरक्षा अनामत रक्कम	कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम (विना परतावा रु.१८% GST सह)	कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ	मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ	काम करावयाचा कालावधी	ठेकेदारांचा नोंदणी वर्ग
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१.	उपकरप्राप्त इमारत क्र. ५९ राधाबाई चाळ, नानाभाई परळकर मार्ग मुंबई-१२ फ दक्षिण विभागा अंतर्गत [आमदार निधीचे काम]	३८०७९०/-	३८०८.००	८,०००/-	५९०.००	दि. ११.०३.२०२४ ते दि. १८.०३.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.००	दि. १९.०३.२०२४ ते दि. २०.०३.२०२४ सकाळी ११:०० ते दुपारी १.००	१० महिने	वर्ग ८ व त्यावरील

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्यूनतम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम १५ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. कोऱ्या निविदा म्हाडा /मुं.म.पा./सा.बां विभाग/ कें. सा.बां.वि/रेल्वे /बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ.दु. व पु. मंडळ यांच्या नावावर दयावी.
6. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, फ[द] विभाग तिसरा मजला ए ॲनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई-१२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो **दि. २०/०३/२०२४** रोजी दुपारी ३.०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ [द] विभाग मुं.इ.दु. व पु. मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा/ वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर] आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने/ साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून, त्यामध्ये जी.एस.टी. अंतर्भुत नाही. जी.एस.टी. ची अदागयी स्विकृत करारनामा मूल्यावर होईल
12. जी.एस.टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता फ (द) विभाग
मुं. इ. दु. व पु. मंडळ

CPRO/A/327

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था